नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १२९ | Issue - 129 | वार - रविवार दि. ४ ऑक्टोबर २०२६ | Blow- Sunday Date 4 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारताचा आशियावर झेंडा, पाकिस्तान चारीमुंड्या चीत



## श्रेयस अय्यरच्या टीम इंडियाने गोल्ड मेडल जिंकलं!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या क्रिकेट फायनलमध्ये भारतीय संघाने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. जपानमधील कोरोगा स्पोर्ट्स पार्कवर खेळल्या गेलेल्या या हाय-व्होल्टेज सामन्यात, भारताने पाकिस्तानवर १९ धावांनी विजय मिळवला आहे. या सामन्यामध्ये भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २११-६ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला भारताच्या गोलंदाजांनी २० ओव्हरमध्ये १९२-६ धावांवरच रोखले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले वर्चस्व कायम राखले असून सलग दुसरे सुवर्णपदक नावावर केले आहे.

टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या भारताने २० ओव्हरमध्ये ६ बाद २११ धावा केल्या होत्या. सलामीवीर अभिषेक शर्माने २८ चेंडूत ६१ धावा आणि उपकर्णधार तिलक वर्माने २१ चेंडूत ५१ धावा झंझावाती अर्धशतके ठोकून पाकिस्तानच्या गोलंदाजीची पिसे काढली होतीत. मधल्या फळीत श्रेयस अय्यर २१ धावा आणि ईशान किशनने २० धावा करत डाव सावरला, तर शिवम दुबे २७ धावा करताना उपयुक्त योगदान दिले. पाकिस्तानकडून अराफत मिन्हासने सर्वाधिक २ बळी घेतले.

भारताच्या २१२ धावांच्या कठीण लक्ष्याचापाठलागकरतानापाकिस्तानचा डाव भारतीय गोलंदाजांच्या शिस्तबद्ध माऱ्यासमोर पत्त्यांसारखा कोसळला. जसप्रीत बुमराह आणि रवी बिश्नोई यांनी सुरुवातीलाच अचूक मारा करत पाकिस्तानवर दबाव आणला. तर अक्षर पटेलने महत्त्वाची विकेट काढली. सामन्यात वॉशिंग्टन सुंदरने सीमारेषेवर अद्भुत रिले कॅच घेतला. पाकिस्तानच्या हसन नवाज याने ९६ धावांची खेळी करत शेवटपर्यंत झुंज दिली होती. परंतु त्याला दुसऱ्या बाजूने कोणाचीही साथ मिळाली नाही. भारताकडून अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी दोन विकेट नावावर केल्या. या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारताने ऐतिहासिक विजय मिळवून तिरंगा अभिमानाने फडकवला. दरम्यान, या सामन्यामध्ये अभिषेक शर्मा ६१ धावा, तिलक वर्मा नाबाद ५१ धावा केल्या होत्या. त्यानंतर पाकिस्तान संघाच्या हसन नवाज आणि सैम अयूब यांनी ५३ चेंडूंमध्ये ८९ धावांची भागीदारी करत चुसर निर्माण केली होती. पण शिवम दुबे याने ही जोडी तोडली. सैम अयुबचा बाउंड्री लाईनवर वॉशिंग्टन सुंदरने घेतलेल्या कडक कॅचनंतर पाकिस्तानवर दबाव वाढला.

# ऑलिम्पिकचे तिकीट पक्के; भारतीय पुरुष हॉकी संघाकडून मलेशियाचा ५-१ ने धुव्वा, एशियन गेम्समध्ये पाचव्यांदा सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जपानमधील ऐची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाने इतिहास रचला आहे. अत्यंत रोमहर्षक ठरलेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने मलेशियाचा ५-१ अशा दणदणीत फरकाने पराभव करत सुवर्णपदक आपल्या नावे केले. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारतीय पुरुष हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकण्याची ही तब्बल पाचवी वेळ आहे.



या ऐतिहासिक विजयासह भारतीय पुरुष हॉकी संघाने २०२८ मध्ये अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी थेट पात्र ठरण्याचा पराक्रम केला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दोन वेळा सुवर्णपदक जिंकणारा भारत हा पाकिस्तान आणि दक्षिण कोरियानंतरचा केवळ तिसरा देश ठरला आहे.

सामन्याच्या पहिल्या १५ मिनिटांत दोन्ही संघांमध्ये जोरदार चुरस पाहायला मिळाली आणि पहिला क्वार्टर १-१ असा बरोबरीत सुटला. मात्र, दुसऱ्या क्वार्टरनंतर भारतीय खेळाडूंनी सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. भारतीय संघाने आक्रमक खेळ करत मलेशियाला चुका करण्यास भाग पाडले आणि सामन्यात तब्बल १४ पेनल्टी कॉर्नर मिळवले.

भारताकडून शिलानंद लकडा याने एकमेव उत्कृष्ट 'फिल्ड गोल' केला. तर कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवरून २ गोल, जुगराज सिंगने पेनल्टी कॉर्नरवरून १ गोल आणि हार्दिक सिंगने पेनल्टी स्ट्रोकवर १ गोल डागला. मलेशियाकडून एकमेव गोल शेलो सिल्व्हेरिअस याने केला.

पदकांच्या यादीत भारत चौथ्या स्थानावर

पुरुष हॉकी संघाच्या या सुवर्णपदकामुळे २०२६ च्या एशियन गेम्समध्ये भारताच्या सुवर्णपदकांची संख्या २१ वर पोहोचली असून एकूण पदकांची संख्या ८५ झाली आहे. या विजयासह भारताने पदक तक्त्यात उझबेकिस्तानला मागे टाकत चौथे स्थान पटकावले आहे.

सुवर्णपदक : भारत (५-१ ने विजय)

रौप्यपदक : मलेशिया

कांस्यपदक : पाकिस्तान (दक्षिण कोरियाचा ५-३ ने पराभव करत कांस्यपदक पटकावले).

# पुणे शिक्षक मतदारसंघ अखेर भाजपकडे; महायुतीतील जागावाटपाचा तिढा सुटला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : विधान परिषदेच्या पाच जागांच्या निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटपाचा तिढा अखेर सुटला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघावर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावा केला जात असताना ही जागा भाजपला देण्यावर महायुतीत एकमत झाल्याची माहिती आहे. त्यामुळे भाजप तीन, शिवसेना एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस एक अशा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, इच्छुकांची संख्या आणि स्थानिक पातळीवरील दावे लक्षात घेता उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच महायुतीसमोर बंडखोरीचे आव्हान उभे राहिले आहे. महायुतीच्या संभाव्य जागावाटपानुसार पुणे शिक्षक, पुणे पदवीधर आणि नागपूर पदवीधर या तीन जागा भाजप लढविणार आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघ शिवसेनेच्या वाट्याला, तर छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला जाणार असल्याचे समोर आले आहे. पुणे शिक्षक मतदारसंघासाठी तिन्ही पक्षांमध्ये काही दिवसांपासून जोरदार रस्सीखेच सुरू होती. अखेर भाजपकडे ही जागा देण्याच्या निर्णयामुळे या संघर्षाला विराम मिळाल्याचे मानले जात आहे. पुणे शिक्षक मतदारसंघ भाजपच्या वाट्याला आल्यानंतर पक्षांतर्गत उमेदवार निवडीची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तीन मतदारसंघांसाठी प्रत्येकी पाच संभाव्य उमेदवारांची नावे अशी एकूण १५ नावांची यादी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे दिल्याची माहिती आहे. केंद्रीय पातळीवर छाननीनंतर उमेदवाराचे नाव निश्चित केले जाणार आहे.

दरम्यान, पुणे शिक्षक मतदारसंघातून विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून काम करणारे कौस्तुभ गावडे हे भाजपचे प्रमुख इच्छुक म्हणून पुढे आले आहेत.

## डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# मराठी ही केवळ संवादाची भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' आणि 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हा अभिमानाचा क्षण

मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच; मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली.

मराठी शब्दसंपदा वाढविण्याची गरज



जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा १३वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत.

त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली.

मराठीच्या समृद्ध शब्दसंपदेचा उल्लेख करताना फडणवीस यांनी मराठी ज्ञानकोश आणि शब्दकोशांच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. विविध कोशांमध्ये लाखो मराठी शब्द नोंदविले गेले असून, ही शब्दसंपदा मराठीच्या समृद्ध भाषिक परंपरेचे दर्शन घडवते, असे त्यांनी सांगितले. मराठीचा हा शब्दवैभव केवळ अभिमानाचा विषय न राहता आधुनिक ज्ञाननिर्मितीमध्येही त्याचा प्रभावी वापर झाला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रातील संकल्पना मराठीत उपलब्ध झाल्यास मराठी खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा बनेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

रोजच्या व्यवहारातून मराठीचे संवर्धन

मराठीचे जतन आणि संवर्धन केवळ शासकीय उपक्रमांपुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक मराठी भाषिकाने आपल्या दैनंदिन व्यवहारातून त्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे. घर, शिक्षण, प्रशासन, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि सामाजिक माध्यमे अशा सर्व क्षेत्रांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर वाढला पाहिजे. परंपरेचा अभिमान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत मराठीला भविष्यातील सक्षम ज्ञानभाषा बनविणे ही सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आपली माय मराठी ही केवळ महाराष्ट्राची ओळख नाही, तर आपला स्वाभिमान आहे. संत ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंतच्या समृद्ध परंपरेने नटलेली मराठी आता सातासमुद्रापार पोहोचली असून, जगभरात तिचा डंका वाजत आहे. भविष्यातही मराठीचा जागतिक विस्तार अधिक वेगाने व्हावा, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. डिजिटल जगत, सोशल मीडिया, पॉडकास्ट, गेमिंग आणि कोडिंगसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढवून नव्या पिढीला मराठीशी जोडले पाहिजे. जगातील ५० हून अधिक देशांमध्ये मराठीचा प्रचार आणि प्रसार वाढविण्याचा संकल्प असून, लंडनमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र' उभारण्याबरोबरच पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये आयोजित केले जाणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

लंडनमध्ये 'मराठी वैश्विक केंद्र', १०० बोलीभाषांचे कोश - उदय सामंत

मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि जागतिक पातळीवर विस्तार करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. पुण्यातील डेक्कन युनिव्हर्सिटीमध्ये मराठी भाषेसाठी 'उत्कृष्टता केंद्र', लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने 'मराठी वैश्विक केंद्र', राज्यातील विविध बोलीभाषांचे १०० कोश आणि नऊ ठिकाणी 'मराठी कौशल्य विकास केंद्र' उभारण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत ग्रंथ भेट देऊन करण्यात आले. यावेळी 'मराठीचे कौतुक भाग-२' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आला.

# महाराष्ट्र आणि गोवा मुख्य संचार लेखा नियंत्रक कार्यालयातर्फे मुंबईत पंधरवडाभर स्वच्छता अभियान आणि श्रमदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र आणि गोव्याच्या मुख्य संचार लेखा नियंत्रक (सी-सीए) कार्यालयातर्फे राष्ट्रीय उपक्रम 'स्वच्छता ही सेवा-२०२६ ' अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पंधरवडाभर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यावर्षीच्या स्वच्छतेत सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत या संकल्पनेनुसार राबवण्यात आलेल्या या अभियानात स्वच्छता, पर्यावरणीय शाश्वतता आणि जनसहभागाला प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला.

या अभियानाचा एक भाग म्हणून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. स्वच्छता आणि स्वच्छताविषयक कामांसाठी स्वेच्छेने वेळ देण्याची तसेच त्यामध्ये योगदान देण्याची बांधिलकी त्यांनी व्यक्त केली. पर्यावरण संवर्धन आणि हरित क्षेत्र वाढवण्यासाठी वृक्षारोपण अभियानही राबवण्यात आले.

कचरा व्यवस्थापन आणि नागरी जबाबदारीबाबत जनजागृती करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी बॅनर आणि फलक हातात घेऊन परिसरातून जनजागृती फेरी काढली. मुंबईतील जुहू तारा रोडवरील बीएसएनएल प्रशासकीय इमारत परिसरात सामूहिक श्रमदानही करण्यात आले. यावेळी परिसरातील कचरा हटवण्यात आला तसेच वाढलेले तण काढण्यात आले. महाराष्ट्र आणि गोव्याचे संचार लेखा नियंत्रक डॉ. सतीश चंद्र झा यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबवण्यात आले.

संयुक्त मुख्य संचार लेखा नियंत्रक खांडागळे धम्मपाल अनिल आणि सहाय्यक मुख्य संचार लेखा नियंत्रक विष्णू भानुदास बोराडे यांनी अभियानाच्या कामकाजात समन्वय राखला. उपस्थितांना संबोधित करताना डॉ. झा यांनी, स्वच्छता ही केवळ हंगामी उपक्रम न राहता ती सातत्यपूर्ण सवय बनवण्याची गरज असल्याचे सांगितले. स्वच्छ आणि निरोगी भारताच्या निर्मितीसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले प्रयत्न सातत्याने सुरू ठेवावेत आणि सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.






# राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - प्रादेशिक केंद्र, मुंबईच्या वतीने स्वच्छता ही सेवा २०२६ च्या निमित्ताने स्वच्छता मोहीम आणि जनजागृतीपर पथनाट्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - प्रादेशिक केंद्र (एनएडीटी-आरसी), मुंबईने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियान राबविण्यासाठी अकादमीच्या परिसरात विविध उपक्रमांचे आयोजन केले. स्वच्छता, नागरी जबाबदारी आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रति आदराची भावना वाढीस लागावी, हे या उपक्रमांचे उद्देश होते.

स्वच्छता मोहिमेचे नेतृत्व एनएडीटी-आरसी, मुंबईचे प्रधान अतिरिक्त महासंचालक, नवनीत मनोहर यांनी केले. 'एक दिवस, एक तास, एक साथ' या भावनेतून अकादमीतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने या मोहिमेत सहभाग घेतला. त्यांनी अकादमीच्या परिसराची स्वच्छता केली तसेच रोपांची लागवड केली. स्वच्छ परिसर राखणे ही सर्वांची सामायिक जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमाने अधोरेखित केला.

अकादमीमध्ये 'स्वच्छता कुरुक्षेत्र' या शीर्षकाचे जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्याचे नेतृत्व प्राप्तीकर निरीक्षक मदन कुमार यांनी केले. प्रभावी आणि मनोरंजक सादरीकरणातून पथनाट्याच्या चमूने कार्यालयाचा परिसर आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. सार्वजनिक स्वच्छता राखण्यात साफसफाई कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची दखल घेत त्यांना आदरांजली वाहून त्यांचा सन्मान आणि आदर करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

या विविध उपक्रमांच्या माध्यमातून एनएडीटी-आरसी, मुंबईने स्वच्छतेला दैनंदिन सवय आणि सामूहिक जबाबदारी म्हणून अंगिकारण्याच्या आपल्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला. तसेच भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत' या संकल्पने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# महात्मा गांधीजींनी ग्रामोद्योगातून स्वावलंबी जीवनाचा संदेश दिला : मल्लिनाथ कल्याणशेट्टी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महात्मा गांधीजींनी स्वदेशी, ग्रामोद्योग, सुत कताईतून स्वावलंबी जीवन जगण्याचा संदेश दिला त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा मिळाली त्यांचे हेच विचार युवकांनी अंगीकारले पाहिजेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आजचा युवक विघातक शक्तीच्या पाठीमागे धावत आहे, त्यामुळे त्याच्या जीवनाची घडी बिघडत चालली आहे, त्याने गांधीजीनी सांगीतलेल्या मार्गाने वाटचाल करावी, त्यांचा स्वावलंबी जीवनाचा मंत्र स्वीकारून श्रमाला प्रतिष्ठा दिली तर जीवन सुखकर होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन सौरभ भस्मे यांनी केले आभार डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका सौंदर्य शास्त्री, जनाबाई चौधरी, शीतल फुटाणे, ऐश्वर्या तारापुरे, शिवकुमार मठदेवरु, गुरुशांत हपाळे उपस्थित होते.

## साबरमतीला गेल्यामुळे जीवन कृतार्थ झाले

**गांधीजींचे जन्म ठिकाण पोरबंदर व साबरमती आश्रमात जाण्याचा योग आला तेथे गेल्यानंतर गांधीजींच्या भव्य कार्याचे दर्शन झाले अन् आपले जीवन कृतार्थ झाले अशी भावना मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली.**

# रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट यांच्याकडून गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भुरीकवठे, ता. अक्कलकोट : शंकरराव शरणाप्पा आष्टे प्रशाला, भुरीकवठे येथे रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना ५ सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच शंकरराव शरणाप्पा आष्टे प्रशालेत रोटरी क्लबची स्थापना करण्यात आली असून, यानिमित्ताने शाळेला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक श्री. राजकुमार काशिनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष सचिन किरनळी, सचिव डॉ. प्रमोद सुतार, माजी अध्यक्ष गुरुशांत पाटील, माडीवालाप्पा बदोले, प्रा. गंदगे सर, सतीश शिंदे, प्रकाश घिवारे, तुळजापूरे सर तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष सचिन मळी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि परस्पर सहकार्याची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

## शंकरराव शरणाप्पा आष्टे प्रशालेत रोटरी क्लबची स्थापना; शाळेला प्रमाणपत्र प्रदान

रोटरी क्लबच्या वतीने करण्यात आलेल्या ५ सायकलींच्या वाटपामुळे गरजू विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठी मदत होणार असून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळणार आहे. या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने रोटरी क्लबचे आभार व्यक्त करण्यात आले.

शाळेत रोटरी क्लबची स्थापना होणे ही शाळेसाठी महत्त्वाची आणि अभिमानाची बाब असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी विकसित होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सोलंकर सर यांनी उपस्थित सर्व मान्यवर, रोटरी क्लबचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला.

# अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीत बिगर शेती मतदारसंघातून परिघा विश्वास आरोटे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## अकोले तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील सक्रिय सहभागामुळे उमेदवारीकडे लक्ष; बिगर शेती मतदारसंघातील निवडणुकीत चुरस वाढण्याची शक्यता



**अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बिगर शेती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करताना सौ. परिघा विश्वास आरोटे. यावेळी कु. सोनेरी आरोटे, श्री. संजय फुलसुंदर, श्री. विनोद गायकवाड आदी उपस्थित होते. अर्ज स्वीकारताना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक श्री. मंगेश सुरवसे.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर, प्रतिनिधी : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिगर शेती मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या मतदारसंघातून सौ. परिघा विश्वास आरोटे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीतील चुरस वाढण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

सौ. परिघा विश्वास आरोटे यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा उपनिबंधक श्री. मंगेश सुरवसे यांच्याकडे आपले नामनिर्देशन पत्र सुपूर्द केले. उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या समवेत कु. सोनेरी विश्वास आरोटे, श्री. संजय फुलसुंदर, श्री. विनोद गायकवाड तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीला सहकार क्षेत्रात विशेष महत्त्व असते. जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांशी तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेशी बँकेचे महत्त्वाचे संबंध असल्याने या निवडणुकीकडे सहकार क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक घटकांचेही लक्ष लागले आहे. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघातील उमेदवारांच्या हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### बिगर शेती मतदारसंघातून उमेदवारी

बिगर शेती मतदारसंघातून सौ. परिघा आरोटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होऊ लागले आहे. अकोले तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्या सक्रिय असल्याचे सांगण्यात येते. विविध सामाजिक उपक्रमांशी असलेला संपर्क आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहभाग या पार्श्वभूमीवर त्यांनी सहकार क्षेत्रातील निवडणुकीत आपले आव्हान उभे केले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने उपस्थित समर्थक व मान्यवरांनी सौ. आरोटे यांना शुभेच्छा दिल्या. अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेदरम्यान निवडणूक विभागाकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

### सहकार क्षेत्रातील निवडणुकीकडे लक्ष

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत विविध मतदारसंघांमध्ये उमेदवारांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने आगामी काळात मतदारसंघनिहाय राजकीय समीकरणे, समर्थकांची बांधणी आणि प्रचाराची दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

बिगर शेती मतदारसंघात सौ. परिघा विश्वास आरोटे यांच्या उमेदवारीमुळे या मतदारसंघातील निवडणुकीकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. आगामी काळात त्यांच्या प्रचाराची भूमिका, मतदारांशी संपर्क आणि इतर उमेदवारांची भूमिका यावर निवडणुकीचे पुढील चित्र अवलंबून राहणार आहे.

# जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करा; तृतीयपंथी, आराधी व किन्नर समाजाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : तृतीयपंथी समाजाच्या गादीपती नायक यांची बदनामी केली जात आहे. तृतीयपंथीयांमध्ये कोणताही जातिवाद नाही. तरीही जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये, शिवीगाळ, धमकी आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींची बदनामी केल्याच्या कथित प्रकारांची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तृतीयपंथी, आराधी व किन्नर समाजाच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत समाजाच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध पोलिसात तक्रार करण्यात आली आहे. व्हिडिओ कॉल, सोशल मीडिया आणि अन्य माध्यमांतून अपमानास्पद वक्तव्ये, धमकी तसेच सामाजिक तेढ निर्माण करणारे प्रकार घडल्याचा आरोप करण्यात आला. दिलेल्या तक्रारीची तातडीने चौकशी व्हावी अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

या पत्रकार परिषदेस शंकर गायकवाड, रेणुका सोलापूरकर, प्रीती नागटिळक, सौंदर्य एरटे, सदानंद कुरापटी , नर्सिंग बिल्ला उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत विजेतेपदावर कब्जा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि फुटबॉल असोसिएशन, सोलापूर यांच्या सहकार्याने आयोजित १९ वर्षांखालील शालेय जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा वालचंद कॉलेज, सोलापूर येथे उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत MIT माईर्स विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेज, वाखरी, पंढरपूरच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या विजयामुळे संघाने यंदाही आपले वर्चस्व कायम राखले आहे.



## पुणे विभागीय स्पर्धेसाठी १८ खेळाडूंची निवड

स्पर्धेवेळी मुख्य क्रीडा अधिकारी मा. श्री. दत्तात्रय वरकड तसेच श्री. किरण दस्तूरकर यांची उपस्थिती होती.

विजयी संघामध्ये कर्णधार कार्तिक कदम, उपकर्णधार विराज खरसडे, तसेच तन्मय होले, धीरज कदम, ओमकार तिडके, शुभकर गारे, संस्कार मुळे, अविराज काळे, राजवीर खेडकर, कार्तिक ठाकरे, उदय खरात, राजवीर बोरसुरे, प्रवेश महंत, सिद्धार्थ गायकवाड, सम्यक कुलकर्णी, प्रणव शहा, पार्थ पवार आणि प्रिन्स कोळेकर यांचा समावेश आहे.

या सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे आगामी विभागीय स्पर्धेतही संघाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

संघाच्या या यशाबद्दल शाळेच्या हेडमिस्ट्रेस सौ. शिबानी बॅनर्जी आणि प्राचार्य डॉ. श्री. स्वप्नील शेठ यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. संघाला क्रीडा शिक्षक श्री. प्रविण पिसाळ सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# मोहा येथील बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था

## तीव्र आंदोलन छेडण्याचा नागरिकांचा इशारा







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रविण म.कसबे/मोहा प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मोहा येथील स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग मोहा -वैतागवाडी (जुना ग्रामीण रस्ता) या रस्त्याची अतिशय भयावह दुरवस्था झाली आहे.

याच रस्त्यावरून बौद्ध, मातंग, सुतार या अशा दलित , मागासवर्गीय समाजाच्या व सार्वजनिक स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता म्हणजे अतिशय धोकादायक जीवघेणा पावसाळ्यात तर मोठ्या प्रमाणात चिखल,मोठ-मोठे खड्डे रस्त्यावर सतत पावसाचे वाहते पाणी, घनदाट काटेरी झुडपांनी व्यापलेला. या काटेरी झुडपांची, रस्त्यावरील पाण्यासंदर्भात मागणी करूनही कुठल्याही संबंधित विभागाने चारीची व्यवस्था करून पाण्याची विल्हेवाट देखील लावली नाही.आणि याच त्या रस्त्याने एखाद्या व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी घेऊन जाण्यासाठी चिखल, पाणी,मोठ-मोठ्या काटेरी झुडपांनी वेढलेल्या रस्त्याने सुमारे दीड ते दोन कि.मी. अंतर पार करत मयत व्यक्तीला दफनविधीसाठी वाट शोधत न्यावे लागत आहे.

कळंब तालुक्यातील मोहा हे गाव लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे तर आहेच परंतु, हे गाव तालुक्यात राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे समजले जाते.

लोकसभेची निवडणूक असो वा, विधानसभा , जिल्हा परिषद -पंचायत समिती असो की ,पदवीधर मतदारसंघाची असो .राजकीय मंडळीचे या गावाकडे कायमच लक्ष केंद्रित असते. त्यातच या गावातील दलित समाजाचीही मतदार संख्या लक्षणीय असल्या कारणाने आपल्या राजकीय भविष्यासाठी हि मंडळी लक्ष ठेवून असतात. मात्र या समाजाच्या नवीन बुद्ध विहारासाठी अनेक वेळा मागणी करूनही शासन- प्रशासन स्तरावर ना दखल ना त्यांच्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण,ना दफनविधी करण्यासाठी निवाऱ्याची सोय,ना दिवा बत्तीची सोय.. अशा एक ना अनेक समस्यांकडे देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळापासून (८०) ऐंशी वर्षांचा काळ उलटल्यानंतरही या समाजाच्या या सर्व मागणीकडे एकुणच या व्यवस्थेचे दर्लक्ष असल्याने कायमच हा समाज दुर्लक्षित राहिला आहे.

शासन- प्रशासन दरबारी नवीन बुद्ध विहार , स्मशानभूमीकडे जाण्याचा रस्ता, दफनविधीसाठी लागणाऱ्या निवाऱ्याची, दिवा बत्तीची सोय अशा आशयाची अनेक वेळा निवेदने देऊनही या मागणीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने जिल्ह्याच्या आमदार, खासदार, मंत्री महोदयांनी या समाजाच्या सर्व मागणीची दखल घेऊन तातडीने पाहणी करून संबंधित विभागांशी सदरील मागणी मार्गी लावून समाजाची होणारी हेळसांड दूर करावी.अन्यथा बौद्ध, मातंग, चर्मकार समाज रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल असा इशाराही यशसिद्धी न्यूजच्या प्रतिनिधीशी बोलताना दिला आहे.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुल च्या विद्यार्थ्यांकडून पंढरपुरात स्वच्छता अभियान; महात्मा गांधी जयंती निमित्त प्रभुपाद घाट व इस्कॉन मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त वाखरी, तालुका पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी झाडू संतांचे मार्गकरू पंढरीचा स्वर्गया संतांच्या शिकवणीला प्रत्यक्ष कृतीत उतरवत पंढरपूर शहरात व्यापक स्वच्छता मोहीम राबवली. अभियानात इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत येथील नागरिकांना स्वच्छतेच्या कृतीशील संदेश दिला.



पंढरपुरातील पवित्र चंद्रभागा तीरावरील प्रभुपाद घाट तसेच आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या इस्कॉन मंदिर परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले, विद्यार्थ्यांनी हाताला झाडू आणि स्वच्छता साहित्य घेत संपूर्ण परिसरातील प्लास्टिक व कचरा दूर करून परिसर स्वच्छ केला, शालेय विद्यार्थ्यांचे हे श्रमदान पाहून स्थानिक नागरिकांनी भाविकांनी ही त्यांची विशेष कौतुक केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी म्हणाले, स्वच्छता निरोगी जीवनाचा पाया आहे वैयक्तिक आरोग्यइतकेच सामाजिक परिसराची स्वच्छता राखणे हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे आद्यकर्तेव आहे विद्यार्थ्यांना शालेय वयातच स्वच्छतेचे महत्त्व ओळखून ते आचरणात आणल्यास एक सशक्त आणि निरोगी समाज घडण्यास मदत होईल,

यावेळी मुख्याध्यापकांनी प्रत्यक्ष स्वच्छता अभियान प्रभावीपणे कसे राबवावी याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या सामाजिक उपक्रमात शाळेतील सर्व निवासी शिक्षक वृंद आणि शिक्षिकेतील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसमित प्रत्यक्ष स्वच्छता कार्यात सहभागी होत श्रमदान केले.

# मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी प्रशासन मैदानात!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मतदार नोंदणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

## सिंदखेड राजा मतदारसंघात विशेष नोंदणी कॅम्प; उपविभागीय अधिकाऱ्यांकडून मतदान केंद्रांची पाहणी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर हा विशेष कॅम्प राबविण्यात येत आहे.

या विशेष कॅम्पच्या कामकाजाची पाहणी उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी विविध मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन केली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांच्याकडून मतदार नोंदणी व मतदार यादी अद्ययावतीकरणाच्या कामाचा आढावा घेतला.

कॅम्पमध्ये नवीन मतदारांची नोंदणी, मतदारांच्या नावातील दुरुस्ती, पत्ता बदल तसेच मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे यासंबंधी प्राप्त अर्जांवर कार्यवाही करण्यात येत आहे. प्राप्त अर्जांची वेळेत छाननी करून नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

नोंदणीची संधी साधावी

लोकशाही प्रक्रियेत मतदार यादीचे महत्त्व लक्षात घेता पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी. विशेषतः १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवमतदारांनी पुढाकार घेऊन मतदार म्हणून नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गावातील मतदान केंद्रावरच नोंदणी आणि मतदार यादीतील आवश्यक दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांना शासकीय कार्यालयात जाण्याचा अतिरिक्त त्रास टाळता येणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी या विशेष कॅम्पचा लाभ घेऊन मतदार यादी अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती

या पाहणीदरम्यान उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी अजित दिवटे, नायब तहसीलदार प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार संदीप बंगाळे, तसेच नागेश खरात, गणेश देशमुख, रामेश्वर हिरे, बीएलओ आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.




# मनपा मुलांची केंद्र शाळा क्र.५ येथे घनकचरा व्यवस्थापनाचा जागर; स्वच्छतेचा दिला संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मनपा मुलांची केंद्र शाळा क्र.५ सोलापूर येथे ‘स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी (२.०)’ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रमाचे प्रशिक्षक सिद्धांत बाबरे यांनी इयत्ता १ वी ते ७ वी तील विद्यार्थ्यांना ओला व सुका कचरा वर्गीकरण, कचऱ्याचा पुनर्वापर, पुनर्निर्मिती, कचरा कमी करणे तसेच स्वच्छतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. परिसर स्वच्छ ठेवून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना कचऱ्याचे प्रकार, कचऱ्याचा प्रवास, कचरा व्यवस्थापन आणि ‘७ठ’ या तत्त्वांची सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी विविध कृती व उपक्रमांच्या माध्यमातून विषय समजावून सांगण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता राखण्याची तसेच समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याची प्रतिज्ञा घेतली.

कचरा व्यवस्थापनाची सुरुवात शाळेपासून व्हावी या उद्देशाने शाळेला ‘रिसायकल कॉर्नर’ (ठशलूलश्रश उीपशी), कॅलेंडर तसेच कृतीतून शिकण्यासाठी ‘सापशिडी’चा खेळ भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून समजून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य. संदीप घोळवे , वैशाली बोटे, सुवर्णा माने यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. शाळा परिसर नेहमी स्वच्छ व सुंदर राहावा यासाठी प्राचार्य . संदीप घोळवे हे सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळे संकुलात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

संपूर्ण कार्यशाळा आनंददायी व उत्साही वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत घनकचरा व्यवस्थापनाचा संदेश आपल्या कृतीतून समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली बोटे यांनी केले, तर प्राचार्य संदीप घोळवे यांनी आभार प्रदर्शन करत प्रशिक्षक सिद्धांत बाबरे यांचे आभार मानत स्वच्छ महाराष्ट्र मिशन या उपक्रमाचे कौतुक केले.

**द्राक्ष उत्पादक शेतकरी खते, औषधे, मजूर यांच्या नियोजनात व्यस्त**

# निफाड तालुक्यात द्राक्ष वेलींच्या ऑक्टोबर छाटणीला वेग..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ‘महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया’ म्हणून ओळख असलेल्या निफाड तालुक्यात सध्या द्राक्ष बागांमध्ये ऑक्टोबर छाटणीची लगबग सुरू झाली आहे. ‘द्राक्ष पंढरी’ म्हणून लौकिक असलेल्या या तालुक्यात हजारो द्राक्ष उत्पादक शेतकरी पुढील हंगामाच्या उत्पादनाचे नियोजन करताना दिसत असून, यंदा पाण्याची उपलब्धता आणि हवामानाची स्थिती यावर छाटणीचे वेळापत्रक मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार असल्याचे चित्र आहे.

नाशिक जिल्ह्यात सुमारे १ लाख ६० हजार एकर क्षेत्रावर द्राक्ष लागवड असल्याचा अंदाज असून, त्यापैकी निफाड तालुक्यात सुमारे ५८ हजार एकर क्षेत्र द्राक्ष पिका खाली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या द्राक्ष अर्थव्यवस्थेत निफाड तालुक्याचे महत्त्व मोठे आहे.

यंदा कमी पाऊस, काही भागांत खालावलेली पाणीपातळी आणि सिंचनाच्या उपलब्धतेतील तफावत यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसमोर छाटणीचे योग्य नियोजन करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून आणि सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत अवघ्या चार ते पाच टक्के क्षेत्रावर आरली छाटणी झाल्याचे चित्र होते. त्यानंतर सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात छाटणीच्या कामाला वेग आला आहे.ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची मुबलक आणि खात्रीशीर सोय आहे, त्या भागांत ऑक्टोबर महिन्यात मोठ्या प्रमाणावर छाटणी होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, पाणीटंचाई असलेल्या भागातील शेतकरी उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन छाटणी पुढे-मागे करण्याचे नियोजन करीत आहेत. त्यामुळे यंदाचा छाटणी हंगाम हा ‘पाणी असेल तरच छाटणीचे योग्य नियोजन’ या समीकरणाभोवती फिरताना दिसत आहे.काही शेतकऱ्यांनी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी अर्ली छाटणीचा मार्ग स्वीकारला आहे. मात्र अर्ली छाटणी केलेल्या काही बागांमध्ये फुटी मागे-पुढे होणे, तर काही ठिकाणी फुटीची वाढ सुरळीत न होणे यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आहे. ज्या बागांसाठी पाण्याची उपलब्धता अद्याप समाधानकारक आहे, त्या ठिकाणी शेतकरी परिस्थितीचा अंदाज घेऊन छाटणीचे नियोजन करीत आहेत.दरम्यान, काही भागांत पाण्याची उपलब्धता कमी होत असल्याने अशा बागांची छाटणी १५ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. छाटणीला अनावश्यक विलंब झाल्यास पुढील हंगामातील फुटी, फुलोरा आणि उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहेत.यंदाच्या हवामानावरही द्राक्ष उत्पादकांचे लक्ष लागले आहे. भारतीय हवामान विभागाच्या २०२६ मधील हवामानविषयक माहितीत मान्सून काळात एल निनो परिस्थिती विकसित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे पर्जन्यमान, तापमान आणि आर्द्रतेतील बदलांचा द्राक्ष बागांच्या व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो. मात्र स्थानिक पातळीवरील पाऊस आणि हवामानातील बदलांनुसारच अंतिम नियोजन करणे आवश्यक राहणार आहे.पावसाचे प्रमाण आणि आर्द्रता तुलनेने कमी राहिल्यास द्राक्ष बागांमध्ये काही रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होण्याची शक्यता आहे. मात्र त्याच वेळी जमिनीतील ओलावा आणि सिंचनासाठी उपलब्ध पाणी ही शेतकऱ्यांसमोरील प्रमुख चिंता राहणार आहे.



## पाणी पाहून छाटणीचे धोरण

**द्राक्ष बागेची छाटणी ही पुढील संपूर्ण हंगामाच्या उत्पादनाचा पाया मानली जाते. त्यामुळे यंदा छाटणीची घाई करण्याऐवजी उपलब्ध पाणीसाठा, जमिनीतील ओलावा, बागेची अवस्था आणि हवामानाचा अंदाज यांचा विचार करून छाटणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे.येत्या पंधरा दिवसांत निफाड तालुक्यातील द्राक्ष बागांमध्ये छाटणीचे काम मोठ्या प्रमाणात सुरू होण्याची शक्यता असून, यंदाच्या द्राक्ष हंगामाचे गणित ‘पाण्याच्या उपलब्धतेवर’ कितपत यशस्वी ठरते, याकडे द्राक्ष उत्पादकांचे लक्ष लागले आहे.**

**– नंदू पडोळ**
**संचालक – द्राक्ष बागायतदार संघ**

# गांधींचा सत्याग्रह विश्वमानवतेसाठी : डॉ. उल्हासदादा पवार

## डब्ल्यूपीयूमध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : संपूर्ण जग आज युद्धाच्या छायेत अस्वस्थ आहे. अशा वेळी गांधी जयंती ही संयुक्त राष्ट्रातर्फे जागतिक अहिंसा दिन म्हणून संपूर्ण जगात साजरी केली जाते, हे सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह हा मूलमंत्र गांधीजींनी दिला. गांधीजींचा सत्याग्रह हा विश्वमानवतेसाठी होता, असे विचार ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. उल्हासदादा पवार यांनी व्यक्त केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, माईर्स एमआयटी शिक्षण समूह व पीस विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर मंडपात आयोजित स्मरण महामानवांचे या अभिवादन



कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.

यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, एमआयटीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. एस. एन. पठाण, प्रा. डॉ. मिलिंद पात्रे, डॉ. महेश थोरवे, लेखक अनिल जोशी, डॉ. विनोदकुमार जाधव, विष्णू भिसे, कर्नल तांदळे आणि बिपीन जोशी उपस्थित होते.

डॉ. उल्हासदादा पवार म्हणाले, गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाला प्राधान्य दिले. सर्वधर्मसमभाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार समाजात रुजावा, तसेच भारतातील कोणताही समाज जाती आणि धर्माच्या आधारावर विभागला जाऊ नये, असा त्यांचा विचार होता. मानवता, समता व नैतिकता या तीन मूल्यांवर आधारित सत्याग्रहातून संघर्ष उभा करण्याचे तत्त्व न्या. रानडे यांनी गांधीजींना दिले. लाल बहादूर शास्त्री हे गांधीजींचे शिष्य होते. शांतता, नम्रता आणि तत्त्वांप्रती निष्ठा ठेवून शास्त्रींनी देशसेवा केली. गांधी आणि शास्त्रींच्या विचारांची जाणीव ठेवून त्याच मूल्यांवर डॉ. विश्वनाथ कराड यांचे कार्य सुरू आहे.

विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, सत्य, अहिंसा आणि शांती हेच खरे मानवी जीवनाचे तत्त्व आहे. धर्मग्रंथ हेच खरे जीवनग्रंथ आहेत हे ओळखून गांधीजी सतत शांतीच्या मार्गाने वाटचाल करत राहिले. गांधींचा आणि बुद्धांचा देश म्हणूनच आज जगात भारताची ओळख आहे. आज जागतिक स्तरावर युद्धजन्य स्थितीत गांधीजींच्या सत्य, अहिंसा, प्रेम, शांती आणि विश्वमानवतेच्या विचारांची गरज आहे. सत्याचे सातत्य टिकवणारे सत्याग्रही महात्मा गांधी हेच आज विश्वशांतीचा आणि विश्वकल्याणाचा एकमेव विचार आहेत.

डॉ. मिलिंद पांडे म्हणाले, या देशात गांधींच्याच विचारांची गरज आहे. एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठात गांधीजींचे विचार अभ्यासक्रमात शिकवले जातात. वर्ल्ड पार्लमेंटच्या माध्यमातून हे विचार सर्वांपर्यंत पोहोचवत राहू.

डॉ. एस. एन. पठाण म्हणाले, हिंदू-मुस्लिम भाईचारा देणारी ही व्यक्तिमत्त्वे होती. सर्वजण एकाच ईश्वराची लेकरे आहेत. नव्या पिढीला महात्मा गांधी सांगायला हवेत. विष्णू भिसे म्हणाले, गीतेचा सिद्धांत अध्यात्माच्या माध्यमातून गांधीजींनी कृतीत उतरवला. या देशात सत्य, अहिंसा आणि नैतिकतेचा पाया घातला. जगातील बलाढ्य देशही आज गांधीजींचे अनुयायी होऊ लागले आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद पात्रे यांनी केले. डॉ. भागवत बिऱ्हाडी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महेश थोरवे यांनी आभार मानले.

---

## एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी सवलत कार्ड नोंदणीसाठी शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोप/केतन भोज ; भारतीय जनता पार्टी - प्रभाग क्रमांक १२९च्या वतीने एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी सवलत कार्ड नोंदणीसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपा नगरसेविका सौ. अश्विनी भरत मते यांच्या सहकार्याने एस.टी. महामंडळ आपल्या दारी या संकल्पनेअंतर्गत हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

बुधवार ६ ऑक्टोबर २०२६ व गुरुवार ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नगरसेविका सौ. अश्विनी भरत मते यांच्या कर्तव्य भवन कार्यालय , पारसीवाडी, घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथील कार्यालयात महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलत कार्ड नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शिबिरात १२ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व महिलांना महिला सवलत योजनेअंतर्गत, तसेच ६५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना आणि ७५ वर्षांवरील अमृत नागरिकांना पुरुष सवलत योजनेअंतर्गत नोंदणी करता येणार आहे.

नोंदणीसाठी आधार कार्ड आणि आधार कार्डला लिंक असलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. नोंदणी शुल्क १९९ रुपये असून, नोंदणीनंतर सवलत कार्ड ३० दिवसांत मिळणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील पात्र नागरिकांना एस.टी. सवलत कार्डासाठी नोंदणीची सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देण्यात येत आहे.

---

## अभिजित दिपके च्या डोक्यात हवा; बेताल वक्तव्य थांबवली नाही तर दिपके विरुद्ध आर पी आय कडक पाऊल उचलेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अभिजित दिपके यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांबद्दल चुकीचे वक्तव्य केले आहे.पंडित नेहरूंनी डॉ आंबेडकरांना पुढे आणले असे विधान अभिजित दिपके यांनी केले असून त्यांच्या या विधानाचा आम्ही तीव्र निषेध करतो. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे संपूर्ण देशाला पुढे आणले आहे. इतिहास विसरून चुकीचे वक्तव्य करणाऱ्या अभिजित दिपके यांच्या डोक्यात हवा शिरली आहे.ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अत्यंत चुकीचे अनादर करणारे वक्तव्य करीत आहेत.त्यांनी बेताल वक्तव्य बंद करावीत नाहीतर रिपब्लिकन पक्ष अभिजित दिपके विरुद्ध कडक पाऊल उचलेल असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री





ना रामदास आठवले यांनी आज मुंबईत बांद्रा येथे पत्रकारांशी बोलताना दिला.

**केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा इशारा**

काही विद्यार्थी तरुण अभिजित दीपके यांना पाठिंबा देत आहेत. ही चांगली बाब आहे. तरुणांच्या पाठिंब्याचा सदुपयोग करावा.वाढत्या पाठिंब्यामुळे त्यांच्या डोक्यात जास्त जावा शिरली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांबद्दल चुकीचे वक्तव्य करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. दिपके यांनी चुकीचे बोलणे टाळावे;महनीय व्यक्तींवर ;लोकशाहीत बहुमताने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींवर बेछूट टीका करताना बेताल वक्तव्य त्यांनी थांबवावित अन्यथा रिपब्लिकन पक्ष कडक भूमिका घेऊन त्यांना अस्मानातून जमिनीवर आणेल असा इशारा ना. रामदास आठवले यांनी दिला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाचा विकास केला आहे.अभिजित दिपके आता महाराष्ट्रात छत्रपती संभाजी नगर आणि राज्यात फिरत आहेत.त्यांनी रस्ते विकास पहिला आहे.त्यामुळे प्रधानमंत्री मोदींबद्दल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल चुकीचे अवमानकारका बोलणे अभिजित दिपके यांनी करू नये. अभिजित दिपके यांनी आपल्या चुकीचे वक्तव्याबद्दल माफी मागितली पाहिजे.असे ना. रामदास आठवले म्हणाले.

---

## विक्रोळी पार्कसाईट येथे स्वच्छता व जनजागृती अभियान उत्साहात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोजः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियान अंतर्गत 'सेवा - मेरा योगदान' या उपक्रमाच्या माध्यमातून विक्रोळी पार्कसाईट परिसरात स्वच्छता अभियान व जनजागृती अभियान राबविण्यात आले.यावेळी परिसरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व,सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे तसेच स्वच्छ व निरोगी परिसर राखण्याबाबत जनजागृती करण्यात आली.नागरिकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला.या अभियानास भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे,वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता,दत्ता सोनावणे,मंडल अध्यक्ष संतोष गांजले तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## कळंब येथे साईनगर हौसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न; थकबाकीदारांवर कारवाईचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : येथील साईनगर हौसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा आज दि. २७ सप्टेंबर रोजी साई मंदिराच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.



सभेच्या अध्यक्षस्थानी सोसायटीचे ज्येष्ठ सभासद माणिकराव लांडगे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटीचे मुख्य प्रवर्तक संजय देवडा, जेष्ठ मार्गदर्शक भागवत मोरे, तसेच लेखा-परीक्षक संतोष देवकर हे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात -

सभेच्या प्रारंभी सोसायटीच्या दिवंगत सभासद कै. श्रीमती कुलकर्णी व कै. कुलकर्णी यांना सर्व सभासदांनी उभे राहून दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहिली.

वेळेवर मेंटेनन्स भरणाऱ्यांचा सन्मान -

सोसायटीचा कारभार सुरळीत चालण्यासाठी वेळेवर व संपूर्ण मेंटेनन्स भरणाऱ्या आदर्श सभासदांचा यावेळी सोसायटीच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यामुळे इतर सभासदांनाही प्रेरणा मिळेल, असे अध्यक्षांनी सांगितले.

**सचिवांचा आढावा -**

सोसायटीचे सचिव विलास मुळीक यांनी प्रस्तावना करत मागील वर्षाचा जमा-खर्च, सोसायटीत करण्यात आलेली विकासकामे व भविष्यातील नियोजित कामांचा आढावा सभेपुढे मांडला. सर्वसाधारण सभेत पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा रक्षक, लाईट बिल व थकबाकी या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी महारुद्र वाघचौरे, गणेश डोंगरे, शामराव कोयले, जयपाल शिंदे, बळीराम ढवळे, नानासाहेब कवडे, सत्येन शेळके, शिवाजी चिलवंत, जगदीश खोगरे, मारुती लोकरे यांच्यासह बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

सभेचे सूत्रसंचालन नानासाहेब कवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शामराव कोयले यांनी केले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

---

## चिराडपाडा येथे वैशाली माडे फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रति/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पिसे केंद्रातील जिल्हा परिषद मराठी शाळा, चिराडपाडा येथे वैशाली माडे फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी आणि शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून शाळेतील एकूण ७० विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून वैशाली माडे फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली. सदर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हैबती धेंडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिनेअभिनेते शिरीष पवार यांनी केले. यावेळी सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांसाठी गाणे सादर करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला आणि शिक्षणाबाबत जनजागृती केली. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाणे जिल्ह्याच्या वतीने ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे आणि जिल्हा सचिव कैलास ढमणे यांच्या हस्ते सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे यांना सन्मानचिन्ह देऊन विशेष सन्मानित करण्यात आले. यावेळी भगवान चंदे आणि हैबती धेंडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे, जिल्हा सचिव कैलास ढमणे, भावना ढमणे, पोलीस पाटील दीपक ढमणे, शाळेचे मुख्याध्यापक अविनाश सोनावणे, सहशिक्षिका नंदिनी पाटील, गोपाळ साळवे, गोरख अहिरे, विजयकुमार वाघ, सागर भोईर, अनंता तरणे, कमलेश जाधव, आदेश जाधव तर आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते कमलेश जाधव व पत्रकार कैलास ढमणे यांनी विशेष प्रयत्न केले.

**सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद**

---

### साहित्य संमेलनासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार - आमदार दिलीप बनकर

## निफाडमध्ये साहित्याचा जागर, विचारांची मेजवानी होणार..!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथे होऊ घातलेल्या नाशिक जिल्हा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या नियोजनासाठी निफाड उपबाजार आवारातील शेतकरी निवास येथे विचारविनिमय बैठक उत्साहात पार पडली. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून निफाडमध्ये साहित्याचा जागर आणि विचारांची मेजवानी होणार असून, या उपक्रमासाठी तालुक्याचा प्रतिनिधी म्हणून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही आमदार दिलीप बनकर यांनी दिली.

निफाड येथे झालेल्या आजच्या विचार विनिमय बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार दिलीप बनकर होते. व्यासपीठावर माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे , कवी प्रकाश होळकर, अर्जुन कोकाटे, कवी लक्ष्मण महाडिक, शीतल कुयटे आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार बनकर म्हणाले,की निफाड येथे साहित्य संमेलन होत आहे, ही निफाडकरांसाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची निफाड ही जन्मभूमी असून, त्यांच्या पुढाकाराने १८७८ मध्ये पहिले साहित्य संमेलन पार पडले होते. त्यामुळे साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा आणि भूमिकेचा निफाडकरांना अभिमान आहे.,पुणे येथे जानेवारी २०२७ मध्ये साहित्य परिषदेच्या माध्यमातून होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर निफाड येथे होत असलेले हे ग्रामीण साहित्य संमेलन माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. माझ्या विधानसभा मतदारसंघात साहित्याचा जागर आणि विचारांची मेजवानी होत आहे, हे निफाडकरांचे भाग्य आहे. या साहित्यिक उपक्रमासाठी तालुक्याचा प्रतिनिधी म्हणून मला जे जे सहकार्य करता येईल, ते निश्चितपणे करणार आहे, अशी ग्वाही आमदार बनकर यांनी दिली.बैठकीच्या प्रारंभी स्व. विनायकदादा पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्षा वि.दा. व्यवहारे यांनी निफाड येथे प्रस्तावित असलेल्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर प्रास्ताविक केले. त्यानंतर उपस्थित साहित्यिक, कवी, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी संमेलनाच्या आयोजनाबाबत विविध सूचना मांडल्या.

यावेळी विवेक उगलमुगले, राजेंद्र सोमवंशी, बाळासाहेब गिरी, साहेबराव बर्डे, मुकुंद ताकाटे, प्रशांत केंदळे, विशाल टरले, शीतल कुयटे , गोपाळ पाटील, जलाल महाराज, मालती वाघावकर, प्रकाश दायमा, अर्जुन कोकाटे, राजेंद्र डोखळे , लक्ष्मण महाडिक, अशोक सोनवणे, नानासाहेब बोरस्ते, प्रकाश होळकर, प्रतिभा जाधव आदींनी साहित्य संमेलनाच्या आयोजनासंदर्भात आपल्या सूचना व भावना व्यक्त केल्या.निफाडला लाभलेली साहित्यिक व ऐतिहासिक परंपरा, न्यायमूर्ती रानडे यांचे योगदान आणि ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तावित संमेलन महत्त्वाचे ठरणार असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.बैठकीचे सूत्रसंचालन प्रा. मधुकर माळी यांनी केले, तर संजय आहेर यांनी आभार मानले. यावेळी राजाभाऊ शेलार, राजाभाऊ राठी, अंजलीताई उगावकर, कैलास सोनवणे, सचिन होळकर, भारतीताई कापसे, राजाबाबू होळकर, सागर पाटील कुंदे,सुहास सुरळीकर, यांच्यासह अनेक साहित्य प्रेमी उपस्तितीत होते.विचार विनिमय बैठक यशस्वी होण्यासाठी शिवाजीराजे ढेपले सुभाष खाटेकर आदींनी विशेष परिश्रम घेतले